**श्री हरिहर सद्गुरु शक्तीपीठ**

श्रीरेणुकामाता मंदिर औरंगाबाद

श्री गणेशाय नमः

नमन करू विघ्नेश्वरासी ।शरण जावे सद्गुरुसी ।।

भोगू आत्मनंदासी ।सर्वकाळ ।।१।।

सद्गुरुराया तुम्हासी नमन ।वारंवार असो जाण ।।

दर्शन द्यावे झडकरी येऊन ।हीच विनंती चरणांसी ।।२।।

अनंत अपराध घाली पोटी ।अज्ञान उडवी झटपटी ।।

कृपादृष्टी व्हावी उठाउठी ।हीच विनंती चरणांसी ।।३।।

तूच आमुची कुलदेवता ।आराधना तुझीच आता ।।

पाठीराखा तूची असता ।शरण जाऊ कवणासी ।।४।।

तूची कर्ता तूची भर्ता ।तूची अससी अन्नदाता ।।

कुटूंब रक्षिसी तत्वता ।दर्शन द्यावे झडकरी ।।५।।

मती झालेसी भ्रांत ।काही सुचेना बैसलो निवांत ।।

मार्ग द्यावा आता त्वरीत ।शरण शरण सर्वकाळ ।।६।।

प्रपंच हाची सुचेना ।परमार्थ हाची घडेना ।।

मन गोंधळले जाणा ।कवण्या वाटे जाऊ पहा ।।७।।

कर्ममार्ग बंद पडला ।चित्ताचा सर्व भास उडाला ।।

कोणत्या जाईल थराला ।हेचि काही कळेना ।।८।।

उपवास तेही घडेना ।निद्रापण हि हटेना ।।

नामचिंतन मुखी येईना ।आळस भरला असे ।।९।।

विचार पण ते काही नाही ।मति माझी गुंगीत राही ।।

काय ?करावे आता पाही ।सद्गुरू राया उमजेना ।।१०।।

आपण सर्व मार्ग दाखविता ।तो न येई माझे हाता

काय ?आहे हि \न्युनयता | सद्गुरु राया कृपा करी ||११||

आपण जे जे सांगीतले | आतापर्यंत करून घेतले ||

लक्ष आता का कमी केले | बालकावरचे पहा ||१२||

सकाम तेही कळेना | निष्काम तेही वळेना ||

गोंधळ झालासे मना | दूर करी सद्गुरु राया ||१३||

त्रिविधतापातुनी मुक्त करावे | अध्यात्ममार्गी रिझवावे ||

सदैव येउनि दर्शन द्यावे | विनंती हि आपुले पायासी ||१४||

आता पूर्ण करावी कृपा | नेउनि बैसावे निर्विकल्पा ||

समाधी सुखाची अवस्था | सर्वकाळ असावी ||१५||

जी जी क्रिया सांगाल | ती ती करोनी घ्यावी बहुमोल ||

आम्ही पामर आहोत फोल | अज्ञानी जैसे बालक ||१६||

अज्ञान बालका हिरा देता |फेकुनी देई तो तत्वता ||

त्याच्चे ज्ञान तयासी नसता |किंमत त्याची तया  नसे ||१७||

तैसे झाले आम्हा अज्ञाना | कृपा करावी झडकरी जाणा ||

आत्मज्ञानाच्या द्याव्या खुणा | हीच विनंती सद्गुरु पायी ||१८||

कर्म हीन झालो आता | पुनीत करावे तत्वता ||

मार्ग द्यावा शीघ्रता | हीच विनंती तुमचे पायी ||१९||

आपुली पूर्ण कृपा आहे | म्हनिनी सर्व चालत आहे ||

कुटुंब रक्षिले आपणाची पाहे | सर्व प्रकारे करोनिया ||२०||

आपुली कैसी करावी स्तुती | मज अज्ञाना नाही मति ||

विशेषण काय द्यावे पुढती | नमन सर्वकाळ ||२१||

मागणे एकची आता | तव कृपा असावी अखंडीता ||

अज्ञानी बालक शरण तत्वता |सद्गुरुरायासी ||२२||

आता साष्टांग करितो नमन |चरणांसी बैसती होऊनी लीन ||

कृपा प्रसाद ग्घेतो मागून |अत्यादरे करोनिया ||२३||

द्यावा आता प्रसाद |हाची धरिला मनी हट्ट ||

सद्गुरुराये होऊनी प्रगट |मस्तकी हस्त ठेवी पहा ||२४||

समजाउनी बोल सांगती |ऐकावे तुम्ही शीघ्रगती ||

वागावे तैस्याच रीती |अतिप्रेमे करोनिया ||२५||

सांगितल्या नियमे वागावे |अखंड आईचे ध्यान धरावे ||

जगदंब जगदंब ऐसे म्हणावे सर्वकाळ ||२६||

संग सर्वांचा सोडावा |स्नेह रहित देह असावा ||

द्वेष कोणाचा न करावा |ऐसे सांगाती श्रीगुरू ||२७||

भय रहित होवोनी आता |एकाग्र ते करी चित्ता ||

स्वस्वरूपा मिळूनी जाता |खरा आनंद येईल पहा ||२८||

भृंगीवत उच्चार न करी |नामचिंतने स्वर धरी ||

रंगुनी जाई नाम लहरी |सर्वकाळ ||२९||

तेणे साधेल भाव समाधी |सुटतील सर्व उपाधी ||

मुक्ती मिळेल सर्वा आधी |गुरुकृपे करोनिया ||३०||

ऐसे सांगता गुरुराया |नमन केले लवलाहया ||

सद्गुरु गुप्त होवोनिया |आशीर्वादा देते जाहले ||३१||

पती पत्नीने ऐसे वागावे |देहाचे सार्थक करूनी घ्यावे ||

जगदंबेसी प्रत्यक्ष पहावे |ह्याची डोळा ||३२||

आईची ती कृपा होता |नांदेल सर्व समृद्धता ||

इहपर सुखाची वार्ता । येणेच सर्व साधेल ।।३३।।

तळमळीने सर्व सांगून । गुप्त होती तेचि क्षण ।।

सद्गुरुरायासी करून नमन । प्रार्थना हीच संपवली ।।३४।।

ऐशा स्तोत्राचा पाठ । जो नित्य करील देख ।।

अंती पावेल मोक्षपदास । इहपर सौख्य साधुनिया ।।३५।।

जगदंब जगदंब जगदंब जगदंब

।। इति श्री सद्गुरु सिद्धनाथ महाराज स्तोत्र श्री कृष्णतनय हरी विरचिता श्री जगदंबार्पणमस्तू ।।

।। प. पू. सद्गुरू सिद्धनाथ महाराज की जय ।।